# सैनिकी शाळा : महाराष्ट्र शासनाची महत्वाकांक्षी योजना

सैनिकी शाळा ही महाराष्ट्र शासनाने शिक्षण क्षेत्रात सुरु केलेली एक महत्वाकांक्षी योजना आहे. राज्य शासनाने सैनिकी शाळेला इयता ५ वी ते इयता १२ वी (विज्ञान शाखा) पर्यंत मान्यता दिलेली असून ही शाळा पूर्णत: इंग्रजी माध्यमाची व निवासी आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे यांनी निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविला जातो. केंद्र शासनाच्या सैनिक स्कूलच्या धर्तीवर सैनिक शाळेचे कामकाज चालते.

सैन्यदलाने भावी सैन्य अधिकारी घडविण्याच्या महत्त्वाकांक्षी हेतूने ही योजना सुरु केली आहे. सिंधुदुर्ग डिस्ट्रिक्ट एक्स सर्व्हिसमेन असोसिएशनने दिनांक १९ ऑक्टोबर २००३ रोजी आंबोली येथे मुलांसाठी सैनिक शाळा सुरु केली. येथे इयत्ता ५वी ते इयत्ता १२वी (विज्ञान शाखा) पर्यंतचे एकूण आठ वर्ग आहेत. इयत्ता १०वी बोर्डाच्या परीक्षेत शाळेचा बहुतांश विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होऊन सतत नवव्या वर्षी १००% निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे. तसेच इ. १२ वी विज्ञान शाखेचा बोर्ड परीक्षेचा निकाल सतत सातव्या वर्षी १००% लागलेला आहे. तसेच या शाळेतील १३ विद्यार्थी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) परीक्षा उत्तीर्ण झालेले असून काही विद्यार्थी सैन्यात आपली सेवा बजावत आहेत. विविध मैदानी खेळ व क्रीडा प्रकारांमध्ये प्रशाळेने जिल्हा पातळीवर वर्चस्व अबाधित राखले आहे. तसेच शाळेतील खेळाडूंनी विविध खेळप्रकारात राज्यस्तरावर सहभाग घेतला असून साहसी खेळ प्रकारात राष्ट्रीय स्तरावर मजल मारलेली आहे. आमच्या छोट्या सैनिकांनी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी शासकीय जिल्हा संचलनमध्ये छानदार संचलन व लेझीम नृत्य करून शाळेची गुणवत्ता सिद्ध केलेली आहे.

प्रत्येक विद्यार्थ्यातील अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा या हेतूने शाळेने सर्वसमावेशक असा अभ्यासक्रम अंगिकारलेला आहे. क्रमिक अभ्यासक्रमासोबतच सहशालेय व अभ्यासपूरक सैन्यसेवा भवितव्यवेधी उपक्रमांचा अंतर्भाव शालेय अभ्यासक्रमात केलेला आहे. नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी वर्तन अभियांत्रिकी चारित्र्य संवर्धन अशा अभिनव उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला आहे.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात, महाराष्ट्र शासनाच्या क्रिडा विभागातर्फे शाळेच्या १७ वर्षे व १४ वर्षे वयोगटातील खेळाडूंचा सर्व खेळ प्रकारातील सहभाग व उत्कृष्ट कामगिरीसाठी अनुक्रमे रू. ७५,०००/- व रू. ५०,०००/- चे पारितोषिक व सन्मानपत्र देऊन शाळेला गौरविण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक जडणघडण तसेच नैतिक अधिष्ठान साधण्यासाठी तेवढेच प्राधान्य देण्यात येते. विद्यार्थ्यांमधील अंगिभूत कौशल्य विकसित करण्याच्या हेतूने अभ्यासक्रम हा स्वयंशिस्तबद्ध व प्रगत असून याचे नियोजन अशाप्रकारे केलेले आहे जेणेकरून विद्यार्थ्यांमधील अंगिभूत कौशल्यांचा विकास व्हावा. प्रत्येक छात्र हा मुष्टियुद्ध, घोडेस्वारी, अडथळ्यांचे प्रशिक्षण (ऑबस्टॅकल ट्रेनिंग) नेमबाजी, वैयक्तिक तसेच सांघिक मैदानी उपक्रम व खेळांमध्ये सहभागी होतो.

यावर्षी नेतृत्वगुण विकासासाठी विशेष कक्ष तयार केलेला आहे. सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (S.S.B.) तयारी ही वैयक्तिक नेतृत्वगुण संघभावना विकसित करून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधावा या उद्देशाने केली जाते. विद्यार्थ्यांच्या मनात सैनिकी मूल्य व जागरुकता रुजावी यासाठी सैन्य प्रशिक्षण दिले जाते.

शाळेने एक अतिशय गतिमान आणि अभिनव क्रीडाधोरण स्वीकारले आहे. ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला प्रशालेतील सर्व क्रीडाप्रकारात सहभागी व्हावे लागते. आंतरशालेय क्रीडास्पर्धांमध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडास्पर्धांमध्ये जिल्हास्तरावर नेहमी वर्चस्व प्रस्थापित केले आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी वेस्टर्न नौदल कमांड, वसई-विरार, सावंतवाडी अशा विविध ठिकाणी अर्ध मॅरेथॉनमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केले आहे.

शाळा विविध साहसी खेळांचा नियोजित कार्यक्रम राबवते. शालेय साहसी पथकाने राष्ट्रीय पातळीवर लक्षणीय गुणवत्ता नोंदवलेली आहे. अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना NDA, NA, AFA & TES या परीक्षांमधून सैन्यांत अधिकारी पदाच्या संधींचा लाभ घेता यावा हा शाळेचा प्रमुख उद्देश आहे.

गौरवाची बाब अशी आहे की, शाळेने अंगिकारलेला अभ्यासक्रम हा इयत्ता १२वी नंतरच्या सर्व स्पर्धा परीक्षांना प्रमाणभूत आहे. आपल्या पाल्यासाठी आपण आमच्या सैनिक शाळेची निवड केली आहे या निर्णयाचा आम्ही आदर करतो.

### सैनिक शाळेचा परिसर

माजी सैनिक संघटनेने स्थापन केलेली व चालवत असलेली सिंधुदुर्ग सैनिक स्कूल, आंबोली ही एकमेव सैनिक शाळा आहे. म्हणून व्यवस्थापनात सैनिकी मूल्यांची रुजवण केलेली आहे.

आंबोली येथील सदाहरित निसर्ग, आल्हाददायक हवा, प्रसन्न वातावरण, सह्याद्रीचे बेलाग कडे, दरीखोरे असा सैन्य प्रशिक्षणास अनुकूल परिसर हेरून व्यवस्थापनाने सैनिक स्कूलसाठी आंबोलीची निवड केली. विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक जडणघडण तसेच नैतिक अधिष्ठान साधण्याकरिता ही निवड सुयोग्य आहे.





## MISSION STATEMENT

All round development of cadets through diverse training processes in the field of academic, sports and co-curricular activities with special emphasis on inculcating sense of discipline, team spirit, patriotism, high moral values, deligence, leadership qualities and optimal use of available resources to prepare them for entry into Indian Armed Forces.

### AIM

An all round development to include physical fitness, mental robustness and moral character for becoming and Armed Forces Officer through NDA/NA/AFA/TES with special emphasis on becoming a good citizen and leader in all walks of life.

## Guarantee Letter

(TO BE INCORPORATED IN STAMP PAPER)

To,
The Chairman / Principal
Sindhudurg District
Ex- Servicemen Association's,
Sindhudurg Sainik School, Amboli.

**Sub :-** To assure the Government that, My Son/Kumar …................. will not leave the school till 12th std. education. In exceptional case, If he has to leave the school. I am ready to pay the penalty of Rs. 20,000/- (for open category) and in case of backward classes (SC, ST, NT, VJNT & SBC) Rs.10,000/-

Respected Sir,

My Son Kumar………………………………….. has taken admission in your school in …………standard. I will make him to appear for NDA examination & after passing the exam will send him to Pune for his NDA education. I assure you that my son will not leave the school till 12th standard education. In exceptional case, if he is leaving the school I am ready to pay the penalty according to the guarantee letter issued by the Govt. Rs. 20,000/- for open category and Rs. 10,000/- for SC, ST, NT, VJNT & SBC in the Government treasury. I will have no objection if the school authority takes necessary legal action against me in case of penalty.

I have read and agree with the rules and regulation of the school. I shall not claim for the compensation in case of any casual or severe injury cause to the cadet during parade, sports, training, picnic or any other activities.

I will have no objection if my ward wish to participate in the extra curricular activities & training arranged by the school.

**Yours Faithfully,**
Mother / Father / Guardian's Signature
Name & Address

Witness :-
Name Sign.

1.__________________________

2.__________________________

**(Note :-** The guarantee Certificate should be attached with Rs. 20/- Stamp paper)





महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या ३० एकर जागेत शाळा नियोजित भौतिक सुविधा निर्माण करणार आहे. नवीन जागेत आधुनिक भौतिक सुविधांसह उच्चप्रतीची शैक्षणिक संकल्पसिद्धी साधण्याचा संस्थेचा मानस आहे.

### सैनिक शाळेची उद्दिष्ट्ये

१) सर्वांगिण शारीरिक, मानसिक व नैतिक विकास व्हावा म्हणून खालील नेतृत्वगुण आत्मसात करणे.
   - अ) राष्ट्राभिमान
   - ब) जबाबदारीची जाणीव जागृती
   - क) धैर्य आणि शौर्य
   - ड) जीवनाच्या विविध क्षेत्रात वाटचाल करण्याची मानसिक तयारी करणे.

२) जीवनकौशल्ये, चिकित्सक वृत्ती, मानसिक व विद्ववत्तापूर्ण असा वैश्विक दृष्टीकोन विकसित करणे.

३) सद्वर्तन व उच्च चारित्र्य निर्मिती करिता चांगल्या सवयी लावणे.

४) सैन्यदलातील विविध संधीकरिता प्रत्येक छात्राला तयार करणे.

५) इयत्ता १२ वी नंतर कोणत्याही स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्याकरिता विस्तृत ज्ञानाचा सखोल पाया तयार करणे.

### सैनिक शाळेची वैशिष्ट्ये

१) माजी सैनिक संघटनेद्वारे चालविण्यात येणारी महाराष्ट्रातील एकमेव सैनिक शाळा

२) उच्च विद्याविभूषित व अनुभवी शिक्षक वृंद.

३) संशोधनात्मक व शास्त्रीय पद्धतीने तयार केलेली दिनचर्या ज्यातून सुदृढ शरीर, निरोगी मन व आध्यात्मिक विकास साधण्यासाठी चांगल्या सवयी लागतील व नेतृत्वगुण वाढीस लागतील.

४) सर्वंकष सर्वांगीण व परिपूर्ण असा अभ्यासक्रम सशक्त शरीरयष्टी, निकोप निरोगी मन व स्वच्छ चारित्र्य निर्माण करण्यास सर्वंकष, सर्वांगीण व परिपूर्ण असा अभ्यासक्रम राबणारे कार्यक्षम प्रशासन.

५) वैयक्तिक प्रगती, संघभावना व वैश्विक नागरिकत्व घडविणारे शास्त्रोक्त रित्या संचलित शालेय व्यवस्थापन.

६) इंग्रजी भाषा प्रयोगशाळा.

७) अद्ययावत व्यक्तिमत्त्व व नेतृत्वगुण विकास प्रयोगशाळा.

८) सुसंरचित जी. टी. ओ. टास्क ग्रुप.

९) पूर्ण विकसित वैयक्तिक व सांघिक अडथळा प्रशिक्षण.
१०) १० मी. एअर रायफल रेंज.
११) घोडेस्वारी प्रशिक्षण शाळा.
१२) रॉक क्लायबिंग व रॅपलिंग रॉक फेस.
१३) गुरुकूल शिक्षणाप्रमाणे खुल्या वर्गखोल्या.
१४) विद्यार्थ्यांमधील उपयोजित कौशल्यवृद्धी करिता सतत विविध स्पर्धांचे आयोजन.
१५) जबाबदारीची, जाणीव जागृतीकरिता समाजसेवा उपक्रमांचे आयोजन.
१६) सुसज्ज ग्रंथालय व भव्य क्रिडांगण, सुसज्ज व्यायाम शाळा.
१७) स्कॉलरशिप, N.T.S., N.D.A, A.F.M.C., MH-CET, IIT-JEE, NEET स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
१८) स्वतंत्र बॅण्ड पथक, संगीत शिक्षण, लष्करी संचलन
१९) समृद्ध वाचनालय व नियमित वाचनाची व्यवस्था.
२०) प्राथमिक शिष्यवृत्ती, माध्यमिक शिष्यवृत्ती, एन. टी. एस. परिक्षा इ. साठी विशेष मार्गदर्शन.
२१) सैनिकी क्षेत्रातील तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शन / भेटी.
२२) भव्य क्रिडांगणे व क्रीडासाहित्याची उपलब्धता.
२३) प्रशस्त निवास गृहे.
२४) स्वतंत्र अद्ययावत भोजनगृह.
२५) सकस संतुलित व पौष्टिक आहार.
२६) विविध लष्करी स्थळे व सेनाधिकारी भेटींचे आयोजन.
२७) अद्ययावत सर्व सोयीयुक्त वैद्यकीय कक्ष. वैद्यकीय सेवा सदैव तत्पर.
२८) आर्थिकदृष्ट्या मागास / हुशार / होतकरु विद्यार्थ्यांस विविध धर्मादाय संस्थेकडून (चॅरिटेबल ट्रस्ट) आर्थिक शिष्यवृत्ती व मदत.
२९) अद्ययावत संगणक कक्ष व ई-लर्निंग द्वारे अध्ययन अध्यापन

**प्रवेश प्रक्रिया**

मुख्यत: ५ व्या इयत्तेत प्रवेश दिला जातो. शाळेने आयोजित केलेल्या प्रवेश परिक्षेला बसणे अनिवार्य आहे. लेखी परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता चाचणी, वैद्यकीय तपासणी व मुलाखत झाल्यानंतरच अंतिम प्रवेश पूर्ण होईल.

१) सन २०१७ -२०१८ मध्ये इयत्ता ४ थी शिकत असलेल्या व २ जुलै, २००७ नंतर





**List of clothing and equipment be provided by parent :**

| Sr. No. | Items | Quantity |
|---|---|---|
| 1. | Civil Dress (Full Shirt & Pant) | 02 sets |
| 2. | Towel | 02 Nos. |
| 3. | Underwear | 04 Nos. |
| 4. | Cut Banyan | 04 Nos. |
| 5. | Rain Coat / Umbrella | 01 No. |
| 6. | School Bag | 01 No. |
| 7. | Note Books (As per requirement) | |
| 8. | Miscellaneous Items: (Comb, Mirror, Hair Oil, Soap, Toothbrush, Paste, Polish, Hanger, Slipper, Face & body cream) | |
| 9. | Sports Shoes | 1 pair |
| 10. | Private formal shooes | 1 pair |
| 11. | Hankerchief | 6 Nos. |
| 12. | Track suit | 1 set |
| 13. | Iron box (Black 3' x 1½' x 1½') | 1 No. |
| 14. | Oxford English Dictionary | 1 No. |
| 15. | Atlas - world | 1 No. |
| 16. | Items of favourite hobbies eg. camera, drawing and sketching, musical instruments etc. | |
| 17. | Sports items of favourite sports eg. badminton, tennis (rackets, shuttle, balls), skate shoes, sprint spikes etc. | |

**Note :**

The a/m items will be checked at the time of admission. Samples are available at the school store, for exhibit during interview. Please ensure that your ward is properly equipped to avail the full benefits of training.

# IMPORTANT NOTES

1. The information given in this prospectus can be ammended at any time without any prior notice.
2. In case of any doubt, opinion of the Principal, Sindhudurg Sainik School may be sought, which will be final and binding.
3. The rules framed by the Government of Maharashtra and the school from time to time will be binding on the cadets.
4. The details mentioned in the broucher are subject to change as per the situation.
5. Parents should ensure that their cadet is willing and mentally/ physically fit to stay in the military school.
6. Parents should ensure that the routine and discipline of the cadet is maintained at home while the cadet is on vacation.
7. The cadet is not permitted to participate in outside competition or exam without prior permission from the school.
8. To make the cadet self – dependent he will be asked to do his own and school maintenance work. The parents are requested to apprise their child accordingly.





जन्म झालेला असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येईल.

२) इयत्ता ५ वी मध्ये प्रवेशासाठी सदर विद्यार्थी मान्यताप्राप्त शाळेतून इ. ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) प्रवेश देताना गुणवत्ता यादी काटेकोरपणे पाळली जाते. प्रवेशासाठी आवश्यक असणारी वैद्यकीय चाचणी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४) शारिरीकदृष्ट्या सक्षम व बुद्धीमान विद्यार्थ्यांची त्यांच्या गुणवत्तेनुसार निवड केली जाईल. यामध्ये माजी सैनिकांचे पाल्य ५, आर्थिकदृष्ट्या मागास ५ व मागासवर्गीय ५ असे आरक्षण राहील

५) एम.बी.बी.एस. डॉक्टरांकडून आरोग्य तसेच शारिरीक तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे.

६) शाळेच्या डॉक्टरांमार्फत विद्यार्थ्यांची वैद्यकीय चाचणी शाळेतर्फे घेतली जाईल. त्यात शारिरीक तंदुरुस्ती, आरोग्य, कान, नाक, घसा, डोळे इत्यादी वैद्यकीय बाबी विषयी तपासणी केली जाते.

७) आरक्षित जागेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याच्या नावाचे सांक्षांकित केलेले जातीचे प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र व पालकांचा एकूण उत्पन्नाचा दाखला तसेच लागणारी सर्व आवश्यक ती माहिती विविध नमुन्यात पूर्ण केल्याशिवाय प्रवेश निश्चित होणार नाही. अनुसुचित जाती जमातीच्या उमेदवारांनी प्रवेश अर्जासोबत माननीय उपविभागीय अधिकारी यांचेकडून प्रमाणित केलेल्या स्वत:च्या जाती जमातीच्या दाखल्याची साक्षांकीत झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा अर्ज नाकारण्यात येईल.

८) प्रवेश घेतेवेळी पालकांनी प्रवेशासंबंधीचे विद्यार्थ्याचे विहित हमीपत्र २०/- रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर लिहून द्यावे. (नमुना सोबत जोडला आहे.)

९) अर्जदाराने अर्ज भरण्यापूर्वी सर्व सूचना / टिपणे काळजीपूर्वक वाचावीत.

१०) अपूर्ण भरलेले अर्ज, खाडाखोड किंवा गिरवागिरवी केलेले तसेच पालकांनी सही न केलेले अर्ज प्रवेशासाठी विचारात घेतले जाणार नाहीत. अशारितीने नाकारलेल्या अर्जासंबंधी व जास्त किंवा कमी वय असलेल्या मुलांबद्दल कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही. पोस्टाचा विलंब हे कारण स्विकारले जाणार नाही.

११) विद्यार्थ्यांचे पासपोर्ट आकाराचे २ फोटो अर्जासोबत द्यावेत.

## प्रवेश परीक्षा

प्रवेश परीक्षा वर्षातून एकदा एप्रिल / मे महिन्यात घेण्यात येते. इयत्ता ५ वी मध्ये प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका इंग्रजी व मराठी माध्यमात असतील. मुलांची चाणाक्ष बुद्धी, आत्मविश्वास, सामान्यज्ञान, सामाजिक जाणिव, भाषेचे ज्ञान इ. बाबींची पडताळणी केली जाईल. इयत्ता ४ थीच्या अभ्यासक्रमावर आधारीत प्रवेश पूर्व लेखी परीक्षा घेतली जाईल. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली जाईल व गुणवत्ता यादी (मेरीट लिस्ट) तयार केली जाईल. वैद्यकीय चाचणीनंतर अंतिम प्रवेश निश्चित केला जाईल. वरील चाचण्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे.

अ) लेखी परीक्षा –

लेखी प्रवेश परीक्षा २०० गुणांची असेल. परीक्षेची वेळ २ तास राहील.

| क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १) | गणित | ३० |
| २) | सामान्य विज्ञान | ३० |
| ३) | बुद्धिमत्ता | १०० |
| ४) | सामान्य ज्ञान | ३० |
| ५) | भाषा (मराठी/इंग्रजी) | १० |
| | एकूण | **२००** |

ब) शारीरिक क्षमता चाचणी –

सैनिकी प्रशिक्षणासाठी जरुर असलेली शारीरिक क्षमता पाहिली जाईल.

क) वैद्यकीय चाचणी –

प्रत्येक विद्यार्थ्याची सैनिकी प्रशिक्षणासाठी वैद्यकीयदृष्ट्या योग्यता तपासली जाईल.

ड) मुलाखत –

विद्यार्थ्यांच्या वयोगटाला अनुरुप असे सामान्यज्ञान, भाषण, कला, सभाधीटपणा, स्पष्टपणे आपले विचार मांडणे, नेतृत्व गुण यांची चाचणी घेतली जाईल. तसेच त्यावेळी पालकांची मुलाखतही नियुक्त मंडळातर्फे घेतली जाईल.





**For more details please contact or call us on -**

**School Address :-**
Sindhudurg Sainik School
& Jr. College Amboli
A/P – Amboli, Tal- Sawantwadi
Dist. Sindhudurg, Pin – 416532
Ph. No.- 02363 – 240417, 240267
Fax – 02363 – 240417

**Management Office Address :-**
Sindhudurg District Ex-servicemen
Association Sindhudurg
Moti Tower, Shop No.3,
Salaiwada, At – Sawantwadi
Dist. Sindhudurg, Pin – 416510
Ph. No.- 02363 – 275031
Fax – 02363 – 275031

email – sainikschoolamboli@yahoo.co.in
website - www.militaryschoolamboli.com
email- sdeasawantwadi@rediffmail.com
Website - www.exservicemenasso.com

As it is the only Sainik School sanctioned to the ex-servicemen organization in Maharashtra, the management committee wants to preserve and continue the great military tradition of providing good soldiers from Konkan region through imparting military education. The school building and other infrastructure has to be developed in the area of 30 acres land given by the Govt. of Maharashtra. Our mission is to develop overall presonality of an individual to be responsible citizen of the nation who could defend the nation in case of need. We solicit your support for running the school. We earnestly appeal to individuals, trust and funding agencies to donate generously to help us to achieve our goal. Your contribution can make a difference in life of young, talented and needy students from rural area who wants to serve the nation. We will be highly obliged for your generous contribution for this noble cause of developing students from rural area.

All your donations and contributions will go a long way in developing the students from rural area and help in the nation building.

**President,**

Sindhudurg District Ex-Servicemen Association

- Registered under Society Registration Act 1860
  Vide No. Maharashtra / 757 / Sindhudurg / Dated - 22/07/1993
- Registered under Mumbai Public Trust Act 1950

**Note :-** 1) DD / Cheque should be drawn in favour of 'Sindhudurg District Ex-Srevicemen Association' payable at Sawantwadi.

2) Donations are exempted under section 80 G (5) (vi) of Income Tax Act, 1961.

3) The Association is also registered under Foreign Contribution (Regulation) Act, 1976. (F.C.R.A.)





सिंधुदुर्ग सैनिक शाळेत नियमित शैक्षणिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त खालील सैनिकी प्रशिक्षण अभ्यासक्रम शिकविण्यात येईल.

१. प्रतिदिनी उपलब्ध तासिका.................................. ३
२. वर्षभरात उपलब्ध होणाऱ्या कामाचे दिवस ................ २१०
३. एकूण उपलब्ध होणाऱ्या तासिका ........................... ६३०

## तासिकांची विभागणी

| अ.क्र. | विषय | इ.५वी -७ वी (कनिष्ठ) | इ. ८ वी - १० वी | इ. ११ वी - १२ वी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) शारीरिक प्रशिक्षण | ५० | ५० | ५० |
| | ब) खेळ | १० | १० | १० |
| २ | कवायत | ७० | ७० | ७० |
| ३ | हत्यार प्रशिक्षण/नेमबाजी | ४० | ४० | ४० |
| ४ | अश्वारोहन / संगणक | ४० | ४० | ४० |
| ५ | सामान्यज्ञान | ४५ | ४५ | ४५ |
| ६ | युद्ध कौशल्य | १५ | १५ | १५ |
| ७ | नकाशा वाचन | २० | २० | २० |
| ८ | स्वसंरक्षण | २० | २० | २० |
| ९ | योगासन | २० | २० | २० |
| १० | सामान्य सेवा माहिती | १० | १० | १० |
| ११ | इंग्लिश संभाषण | २० | २० | २० |
| १२ | गट चर्चा | २० | -- | -- |
| १३ | संगीत (बॅण्ड) ट्रेनिंग | ४० | -- | -- |
| १४ | शौर्य प्रशिक्षण/ट्रेनिंग | २० | २० | २० |
| १५ | खेळ | २०० | २०० | २०० |
| १६ | नैतिक शिक्षण/व्य. विकास | ३० | ३० | ३० |
| १७ | अतिथी व्याख्याने भेटी व ध्वनी चित्रफिती दिग्दर्शन | सैनिकी प्रशिक्षण | सैनिकी प्रशिक्षण | सैनिकी प्रशिक्षण |
| १८ | समाजसेवा, सामुदायिक विकास | वेळापत्रकाबाहेर | वेळापत्रकाबाहेर | वेळापत्रकाबाहेर |

# दिनचर्या
# MONDAY TO FRIDAY

| HOURS | ACTIVITIES |
|---|---|
| 05.30 | Reveille |
| 06.15 - 06.30 | Morning Roll Call |
| 06.30 - 07.15 | P.T. |
| 07.15 - 07.30 | Community Service /SUPW |
| 07.30 - 08.00 | Lay out & House Inspection |
| 08.00 - 08.30 | Breakfast |
| 08.30 - 09.10 | Self Study |
| 09.15 - 09.30 | Assembly |
| 09.30 - 13.30 | School Session |
| 13.30 - 14.30 | Lunch Break |
| 14.30 - 15.30 | School Session |
| 15.30 - 16.30 | Supervised Study / Tutorial/ NDA / Competitive Exam Guidance |
| 16.30 - 16.45 | Break |
| 16.45 - 17.45 | Games / Military Training |
| 17.45 - 18.30 | Milk / Snacks & Bath |
| 18.30 - 20.00 | Supervised study |
| 20.00 - 20.15 | Evening Roll call |
| 20.15 - 21.00 | Dinner |
| 21.00 - 21.45 | Self study |
| 22.00 | Light Off |





## An Appeal :

### Together let us make their dreams come true

A dream project of starting a Military School at Amboli in 2003 was undertaken by Sindhudurg District Ex-Servicemen Association. The aim of the School is to identify the talent in rural students and prepare them to appear for competitive examinations such as NDA, IMA, AFMC, IPS, IAS etc. under the able guidance of Brig. Sudhir Sawant. The residential School was started in the year 2003 with the first batch having 45 students. The school strength has now grown to 344 students and provides education from 5th to 12$^{th}$ Std. in addition to academics the school has given much emphasis on developing the overall personality of the students.

We have able guidance of senior Army officers and army personnels serving and retired for the development of school. We have many more facilities such as firing range, obstacle training course, Horse riding, gymnasium and a huge playground. Due to the trained Instructors and team of excellent teachers the school has 100% results through out in X & XII board examination all the students have passed in first class and distinctions. Three students of the first batch successfully passed UPSC examination of NDA and one of the student cleared the SSB interview.

In the present time it is difficult to give quality education to the students due to shortage of funds. The Government has stopped non salary grant to school and we have no other sources of income. The Ex-Servicemen Association does not have sufficient funds hence we are looking for support from generous people for financial help. We look forward for your kind and generous contribution for our future development.

## Student Leave :

1. Students will not be permitted to go on leave to attend any religious function. However, in case of medical problem the student may be granted leave on recommendation from the medical authority.
2. In emergency cases the parent may apply to the principal for leave.

## Cancellation of Admission

Once the student is admitted in the school, it is mandatory for him to continue the education up to 12th standard. In exceptional case, parent can withdraw the child after obtaining permission from the education department. The school management can dismiss the cadet from the school for the following reasons :

1. When the behavior of the cadet has negative influence upon other students and spoil the discipline of the school.
2. When the cadet is unable to comply with the daily routine.
3. When the cadet is found to be unfit on medical ground to continue further studies in the school.
4. Cadet who do not pay the school fees on time.
5. Cadet who do not provide the required documents on time or when the parents do not co-operate with the management.
6. When the cadet is absent for long period due to illness.
7. If the cadet leave the school and hostel campus without proper permission.
8. If the cadet is not showing the required progress in academic & physical activities.





## अभ्यासक्रम व सैनिकी प्रशिक्षण

१) सैनिकी शाळा निवासी असून इयत्ता ५ वी ते १२ वी (विज्ञान शाखा) पर्यंत शिक्षण दिले जाईल.

२) शाळेचे माध्यम इंग्रजी आहे.

३) महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ, पुणे यांनी निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकवला जाईल. तसेच इयत्ता १० वी १२ वी ची परिक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असेल. याशिवाय सैनिकी शिक्षण हा वैकल्पिक विषय शाळेमधून शिकविला जाणार आहे. हा विषय प्रत्येक विद्यार्थ्याला अनिवार्य आहे. यात खालील घटक शिकविण्यात येतील.

अ) कवायत (हत्यारी व बिनहत्यारी) :- सैनिकी प्रशिक्षण सैन्य दलातील सेवा निवृत्त अधिकारी देतात.

ब) ऑबस्टिकल कोर्स, अश्वारोहण, नेमबाजी, योगासने, प्राणायाम

क) संगणक प्रशिक्षण

ड) इंग्लिश संभाषण, गटचर्चा, समस्या निवारण, व्यक्तिमत्व विकास

इ) शौर्य प्रशिक्षण, गिर्यारोहण, विविध इनडोअर व आऊट डोअर खेळ

ई) सामान्य ज्ञान

उ) अतिथी व्याख्याने, भेटी

त्याशिवाय शाळेमध्ये पुढीलप्रमाणे प्रशिक्षणे दिली जातात.

१) साहसी खेळ - रॉक क्लायबिंग, रिव्हर क्रॉसिंग, पॅरासेलिंग, रॅपलिंग, हॉर्स रायडिंग इत्यादींचे प्रशिक्षण दिले जाते.

२) संगीत प्रशिक्षण - लष्करी संचलनासाठी वापरले जाणाऱ्या बॅण्डचे प्रशिक्षण दिले जाते.

३) इयत्ता १० वी व १२ वी साठी विविध उपक्रमयुक्त विशेष वर्गाचे आयोजन केले जाते.

(टिप :- वरील विषय वर्ग इ. ५ वी ते १२ वी पर्यंत नियोजनबद्ध अभ्यासक्रमानुसार घेतले जातील.)

# सुविधा

## शारीरिक शिक्षण

सैनिकी शाळेत खेळ व क्रिडा यांतील प्राविण्य व शारीरिक क्षमता यावर भर दिला जातो. शाळेच्या प्रशस्त क्रिडांगणामध्ये एकाच वेळी फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, ऑबस्टिकल कोर्स व अश्वारोहण इ. प्रशिक्षण देण्याची सोय उपलब्ध आहे. याशिवाय नियमितपणे सर्व प्रकारचे खेळ, कवायत, कराटे व योगासने अनिवार्य आहेत. धाडस, जिद्द, निश्चय, कठोर मन या नेतृत्व गुणांचा विकास व शारिरीक कार्यक्षमता जोपासली जावी म्हणून सर्व मुलांना साहसी प्रशिक्षण दिले जाते.

## खेळाच्या स्पर्धा व सहली

तालुका, जिल्हा व आंतरविभागीय व राष्ट्रीय स्पर्धांना विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतले जाते. क्रिडाक्षेत्रात तालुका व जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये सैनिक स्कूलच्या मुलांनी उत्कृष्ट कामगीरी करत विभागीय तसेच राज्य स्तरापर्यंत मजल मारली आहे. मुलांमध्ये साहसी वृत्ती वाढावी, आंबोलीच्या सदाहरीत निसर्गातील जैविक विविधता अभ्यासता यावी यासाठी अभ्यास सहली काढल्या जातात. तसेच ऐतिहासिक, भौगोलिक, वैज्ञानिक व सैन्य दलाशी संबंधित ठिकाणी सहलींचे आयोजन करण्यात येते.

## निवास व भोजन व्यवस्था

शाळेच्या सुसज्ज भोजनगृहात शाकाहारी व मांसाहारी असे दोन प्रकारचे भोजन पुरविले जाते. विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाचा व एकुण दिनचर्येचा विचार करुन आहार तज्ञाकडून मेनूकार्ड तयार करुन घेण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सकस व संतुलित आहाराच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जात नाही. दूध, फळे, कच्च्या पालेभाज्या, फळभाज्या, कडधान्ये, बिस्किटे इत्यादींचा रोजच्या आहारात समावेश असतो. सकाळी नाष्ट्याच्यावेळी वेगवेगळे पदार्थ देण्यात येतात. ठरलेल्यावेळी योग्य तो व पुरेसा आहार देण्यात येतो.

## वैद्यकीय सुविधा

अद्ययावत सर्व सोयीयुक्त वैद्यकीय कक्ष. विद्यार्थ्यांच्या वजन व उंची यांची वेळावेळी नोंद घेऊन त्यांच्या वाढीकडे लक्ष दिले जाते. शाळेने नेमलेले वैद्यकीय अधिकारी पूर्णवेळ उपलब्ध असतात. प्रथमोपचार शाळचे वैद्यकीय अधिकारी करतात. गंभीर आजारासंबंधी पालकांशी चर्चा करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. दरमहा





6. Parents should not provide any extra eatables to cadets.
7. Parents should not visit the school on working day. In case of emergency parent should take prior permission.
8. Parents should not contact their child on school telephone.

## Rules and Regulations:

**Discipline:** In Case of any disciplinary problem created by the cadet the Commandant / Principal has the authority to remove the cadet from the school in the interest of the organization.

**Indemnity :** The school administration will not be responsible to pay any compensation to the cadet on account of any injuries caused during his stay in the school, while taking part in sport and training activities. The expenditure incurred on the treatment of the cadet has to be borne by the parent.

**Cash and Valuables :** Cadets are not allowed to keep any cash or valuable items such as gold chains, mobile phone, video games, wrist watch etc. Money orders should not be send to the cadet.

**Care of Property :** - Cadets are responsible to take care of their belongings. All items should be clearly marked for identification. The administration will not be responsible for any loss of property. In case of any damage caused by the cadet to the school property the cost will be borne by the parents.

**Correspondence :** Parents are requested to restrict correspondence with the school to the minimum. All instructions issued by the school must be followed in letter and spirit.

### Academic Terms:

There are two academic terms in a year. The first term is from June up to Diwali vacation and the second term is from after Diwali vacation to April / May.

### Lectures and Guidance :

On the birth and death anniversary of national heroes and important national days, guest lectures, seminars, debates, group discussion, elocation competitions and career guidance programs are arranged.

### Parent Day and Parent Teacher Meeting:

Parents are allowed to visit the school and meet their child once in a month on fourth Sunday. General Meeting between parents and management is conducted twice in a year after every semister. The presence of parents in the General meeting is very essential for development of the cadet and the school.

### Annual Day Function:

Every year annual day function is celebrated on the occasion of our raising day. The function includes activities like march past, military training demonstrations, marshal art demonstration, prize distribution and cultural program.

### Appeals to the Parents:

1. Parents and guardians are requested to co-operate with the school management in maintaining discipline and proper management of the cadets.
2. Parents are requested to take prompt action on the instructions issued by the school regarding payment of fees, duration of vacation, progress report of the cadet etc.
3. Parents should not request for permission of leave for religious functions during the academic session. Cadets will not be allowed to miss classes.
4. Parents should provide all the necessary material required by the cadet for his routine functioning on priority basis.
5. After vacation, the cadet, must report to the school on due date.





चार ते पाचवेळा मुलांची वैद्यकीय चाचणी केली जाते.

### ग्रंथालय :–

विद्यार्थ्यांना ग्रंथालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ग्रंथालयात भिन्न वयोगटांना उपयुक्त ठरतील अशी इंग्रजी, हिंदी व मराठी विषयांची पुस्तके आहेत. स्पर्धात्मक परिक्षेला उपयुक्त अशा पुस्तकांवर भर दिला जातो. इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेतील वृत्तपत्रे, मासिके व नियतकालिके पुरविण्यात येतात.

### संगणक कक्ष :–

संगणक कक्षासाठी स्वतंत्र खोली असून आवश्यक संगणक संच उपलब्ध आहेत. तसेच इंटरनेट सुविधा उपलब्ध असून ई–लर्निंग प्रणालीद्वारे विविध विषयांचे अध्ययन अध्यापन केले जाते.

### प्रयोगशाळा :–

शाळेमध्ये विज्ञान विषयासाठी रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्र अशा तीन स्वतंत्र, सुसज्ज प्रयोगशाळा आहेत.

### व्याख्यान व मार्गदर्शन :–

महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त विविध विषयांवर वेळावेळी व्याख्याने व चर्चासत्र आयोजित केले जातात. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतले जाते. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या ज्ञानात निश्चितपणे भर घालतात.

### पालक दिन व शिक्षक पालक सभा :–

प्रत्येक महिन्याच्या ४ थ्या रविवारी पालक दिन व प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये दोन्ही सत्रात योग्य वेळी पालक सभा आयोजित करण्यात येते. पालकांनी या पालक सभांना हजर राहणे हे मुलांच्या कल्याणाकरीता व शाळेच्या विकासाकरीता अत्यंत महत्वाचे आहे.

### स्नेह संमेलन :–

दरवर्षी शाळेचा वर्धापन दिन शाळेत साजरा करण्यात येतो. यावेळी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ, विविध गुणदर्शन तसेच सैनिकी प्रात्यक्षिके सादर केली जातील. संस्थेच्या ‘वेध’ या वार्षिक विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येते. या कार्यक्रमातून शाळेच्या विविध उपक्रमाची ओळख करून दिली जाते.

### पालकांचे सहकार्य :–

शिस्त, दक्षता, नेतृत्व गुण, सरळमार्गी वागणूक, सौजन्य हे गुण मुलांमध्ये वाढीस लागावेत म्हणून पालकांनी शाळेशी सहकार्य करावे अशी विनंती करण्यात येत आहे. पालकांकडून पुढील अपेक्षा आहेत.

१) शालेय फी, सुट्टया, प्रगतीपत्रके या संबंधिच्या शाळेच्या परिपत्रकाकडे त्वरीत लक्ष देण्याची सूचना पाळणे.

२) घरी नेहमी होणाऱ्या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी मुलाला शाळेतून गैरहजर राहण्याची परवानगी न मागणे. शाळा सुरु असताना अशी परवानगी दिली जाणार नाही.

